महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०
संपर्क क्रमांक (०२०) २४४७ ६९३८ E-mail: evaluationdept@maa.ac.in

---

# Question Bank

Standard:- 12th

Subject:- History

# March 2023

**सूचना**

१. फक्त विद्यार्थ्यांना प्रश्नप्रकारांचा सराव करून देण्यासाठीच

२. सदर प्रश्नसंचातील प्रश्न बोर्डाच्या प्रश्नपत्रिकेत येतीलच असे नाही याची नोंद घ्यावी.

## पाठ १ युरोपातील प्रबोधन आणि विज्ञानाचा विकास

**प्रश्न १ अ] दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा.**

1. औद्योगिक क्रांतीची सुरवात __________ मध्ये झाली.
   अ) अमेरिका ब) इंग्लंड क) फ्रान्स ड) जर्मनी
2. युरोपाला सर्वप्रथम चीनची आणि आशिया खंडातील इतर देशांची ओळख ____________ यांनी करुन दिली.
   अ) इब्न बतूता ब) कोलंबस क) फर्डिनंड मॅगेलान ड) मार्को पोलो
3. इ. स. 1609 मध्ये ___________ ने अधिक सुधारित दुर्बीण तयार केली.
   अ) केपलर ब) जॉन के क) गॅलिलिओ ड) कोपर्निकस
4. स्पेनचा राजा फार्डीनांड आणि राणी इसाबेल यांच्या पाठिंब्याने ___________ भारताच्या शोधात निघाला.
   अ) कोलंबस ब) वास्को-द-गामा क) मंगो पार्क ड) बार्थोलोम्यू डायस
5. वास्को-द-गामा ___________ बंदरात 1498 साली पोहचला.
   अ) मद्रास ब) कन्याकुमारी क) कालिकत (कोझीकोडे) ड) कोचीन
6. इंग्लंड मधील ______________ याने 'स्पिनिंग जेनी' नावाचे यंत्र तयार केले.
   अ) जेम्स हरग्रीव्हज ब) रिचर्ड आर्कराईट क) एडमंड कार्टराईट ड) जॉन के

**प्रश्न १ ब] पुढील प्रत्येक संचामधील ‘ब’ गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

| | “अ” गट | “ब” गट |
|---|---|---|
| १. | 1)जॉन के - | धावता धोटा |
| | 2)सम्युएल क्रॉम्पटन - | कॉटन जीन |
| | 3) एडमंड कार्टराईट - | यंत्र माग |
| | 4) जेम्स वॅट - | स्टीम इंजिन |

| | “अ” गट | “ब” गट |
|---|---|---|
| 2. | 1) रोलर सिलिंडर प्रिंटींग - | बेल |
| | 2) स्टीम इंजिन - | जेम्स वॅट |
| | 3) क्लेरमॉट बोट - | रॉबर्ट फुलटन |
| | 4) छापखाना यंत्र - | मार्को पोलो |

**प्रश्न २ अ] ऐतिहासिक ठिकाण, व्यक्ती, घटना यासंबंधीची नावे लिहा.**


१. ग्रहमाला सूर्यकेंद्रीत आहे असे प्रतिपादन करणारा
२ . वराहमिहिर यांनी लिहिलेला ग्रंथ :
३. होमरची महाकाव्ये :
४. आफ्रिका खंडाला वळसा घालणारा पहिला दर्यावर्दी :
५. पोर्तुगिजांचा भारतातील पहिला व्हॉईसरॉय :

**प्रश्न २ ब ] दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधाने पूर्ण करा.**

१. पोर्तुगीजांनी आफ्रिका खंडातून गुलाम पकडून नेण्याचा व्यापार सुरू केला कारण –
   अ) त्यांना आफ्रिका खंडात ख्रिस्ती धर्माचा प्रसार करायचा होता.
   ब) आफ्रिकेतील लोक शारीरिक श्रमांसाठी अधिक सक्षम होते
   क) स्वस्तात उपलब्ध होणारे श्रम ही युरोपीय राष्ट्रांची गरज असल्याने या व्यापारात फायदा होता.
   ड) त्यांना आफ्रिकेतील लोकांचे अमेरिका खंडात पुनर्वसन करायचे होते.

२. छपाईचा शोध ही प्रबोधन काळात जगाला मिळालेली सर्वोच्च देणगी होय कारण –
   अ) त्यामुळे अनेकांना रोजगार मिळाला
   ब) त्यामुळे लिखित साधने उपलब्ध झाली
   क) त्यामुळे व्यापाराला चालना मिळाली
   ड) विविध प्रकारची माहिती आणि ज्ञान सर्वसामान्य लोकांपर्यंत पोचणे शक्य झाले.

**प्रश्न ३ अ] पुढील नकाशाचे निरीक्षण करून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा**




१. आफ्रिका खंडाच्या दक्षिण टोकाला काय म्हणतात?

२. वास्को-द-गामा भारतातील कोणत्या बंदरात उतरला?

३. पृथ्वी प्रदक्षिणेचा प्रयत्न करणाऱ्या कोणत्या प्रवाशाचे नाव या नकाशाद्वारे समजते?

४. अमेरिका खंडाच्या दिशेने प्रवास करणाऱ्या कोणत्याही एका खलाशाचे नाव लिहा


५. हा नकाशा कोणत्या विषयाशी संबंधित आहे? / कोणती माहिती या नकाशाच्या मदतीने समजते?

**प्रश्न ३ ब ] संकल्पना चित्र पूर्ण करा :**


**१. खालील तक्ता पूर्ण करा**

| शोध | शोधक |
|---|---|
| ------------------------------ | अेबल जानस्वाँ टासमन |
| मॅडेरा आणि ॲझोरस या द्वीपसमूहांचा शोध | ------------------------------ |
| ------------------------------ | मंगो पार्क |
| ॲमेझॉन नदीच्या मुखाचा प्रदेश शोधला | ------------------------------ |

२.



३. **धर्मयुद्धाच्या अपयशाची कारणे**



**प्रश्न ४ अ] प्रश्न: टीपा लिहा.**

१ )युरोपातील धर्मयुध्दे

२ ) युरोपातील धातूविज्ञान

३ ) आर्थिक राष्ट्रवाद

४ ) औद्योगिक क्रांतीचे परिणाम

**प्रश्न ४ ब] पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

1) युरोपातील सत्ताधीश व व्यापारी यांनी धर्मयुध्दांना पाठिंबा दिला.

2) औद्योगिक क्रांतीची सुरवात सर्वप्रथम इंग्लंड मध्ये झाली.

3) छपाईचा शोध ही जगाला मिळालेली प्रबोधन काळातील देणगी आहे.

**प्रश्न ५ तुमचे मत नोंदवा.**

1) औद्योगिक क्रांतीचे भारतावरही परिणाम झाले

2) औद्योगिक क्रांतीनंतर युरोपात आर्थिक राष्ट्रवाद व साम्राज्यवाद उदयास आला.

3) युरोपात 15 वे व 16 वे शतक हा प्रबोधनाचे उत्कर्षकाळ समजलाजातो.

४) युरोपात १७ व्या शतकात निसर्गाचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रज्ञांनीच आधुनिक वैज्ञानिक ज्ञानाचा पाया रचला.

**प्रश्न ६ पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

1) युरोपातील धर्मयुद्धाच्या उपयशाची कारणेव परिणाम स्पष्ट करा.

2) कापड उद्योगात झालेली औद्योगिक क्रांतीची माहिती लिहा.

३) प्रबोधनकाळातील विज्ञानाचा विकास आणि वैज्ञानिक शोध यांची माहिती लिहा.

**प्रश्न ७ खालील दिलेल्या मुद्यांच्या आधारे सविस्तर माहिती लिहा.**

१. भौगोलिक शोध व शोधक याविषयी सविस्तर माहिती लिहा.

अ ) मार्कोपोलो ब ) हेन्री -द-नॅव्हीगेटर क ) बार्थोलोम्यु डायस

२. प्रबोधन काळात लागलेल्या विविध वैज्ञानिक शोधांची माहिती लिहा

अ) धातूविज्ञान ब) यंत्रांचा उपयोग क) वस्त्रोद्योग

---

# पाठ २ युरोपीय वसाहतवाद

**प्र.१ अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. स्वातंत्र्याचा जाहीरनामा ........... याने तयार केला.

अ. जॉर्ज वाशिंग्टन ब. थॉमस जेफरसनक. लॉर्ड ॲमहर्स्ट ड. लॉर्ड कॉर्नवॉलीस

२. दुसरे ब्रह्मी युद्ध .............. च्या काळात झाले.

अ. लॉर्ड ॲमहर्स्ट ब. लॉर्ड डफरीन क. लॉर्ड डलहौसी ड. ॲशले एडन

३. भारत हि ................. वसाहत होती.

अ. ब्रिटीश ब. फ्रेंच क. डच ड. स्पेन

४. इ.स. १४९६ मध्ये .................. याला इंग्लंडने अमेरिकन भूमीवर वसाहत स्थापन करण्याची परवानगी दिली.

अ. वॉरन हेस्टिंग्ज ब. जॉन कॅबटक. जेम्स वॅट ड. लॉर्ड वेलस्ली

५. १७६५च्या कायद्यानुसार महत्त्वाच्या वस्तूवर स्टॅम्प असणे __________ बंधनकारक केले.

अ. फ्रान्सने ब. स्पेनने क. इंग्लंडने ड. अमेरिकेने

६. इ.स. १७७४ ................... मध्ये भरलेल्या अधिवेशनात ठरल्यानुसार अमेरिकेतील वसाहतींनी वसाहतवादाविरुद्ध लढा पुकारला.

अ. फिलाडेल्फिया ब. बोस्टनक. न्यूयॉर्क ड. पॅरिस

**प्र. १ ब) पुढील संचामधील ब गटामधील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

**१.**

| **अ गट** | **ब गट** |
|---|---|
| १) टोगोलॅंड | जर्मन वसाहत |
| २) इजिप्त | ब्रिटीश वसाहत |
| ३) ऑरेंज फ्रीटेस्ट | डच वसाहत |
| ४) आयव्हरी कोस्ट | पोर्तुगीज वसाहत |

**२.**

| **अ गट** | **ब गट** |
|---|---|
| १) म्यानमारचा राजा | थिबा |
| २) अमेरिकन वसाहतीचा सेनापती | जॉर्ज वॉशिंग्टन |
| ३) टास्मानिया बेट | ऑस्ट्रेलिया |
| ४) तिसरे ब्रह्मी युध्द | लॉर्ड डलहौसी |

**प्र. २ अ) ऐतिहासिक ठिकाण व्यक्ती, घटना यासंबंधी नावे लिहा.**

१) अमेरिकेच्या दक्षिण किनाऱ्यावर फ्लोरिडा ते कालीफोर्नियाचा प्रदेश या सत्तेच्या ताब्यात होता. - ....................

२) या राणीच्या काळात इंग्लंडच्या सागरी मोहिमांना प्रोत्साहन मिळाले. -....................

३) १६०७ जेम्स नदीच्या काठावर ब्रिटिशांनी वसाहत उभारली तिचे नाव - ....................

४) उत्तर अमेरिकेतील पूर्व किनारी प्रदेशातील न्यूइंग्लंड ते कॅरोलीन पर्यंत या सत्तेची वसाहत होती. ....................

५) १८९० च्या तहानुसार सिक्कीम इंग्रजांचे संरक्षित राष्ट्र असल्याने मान्य करण्यात आले. - ....................

६) भूमध्य समुद्र व तांबडा समुद्राला जोडण्यासाठी सुएझ कालव्याच्या निर्मिती साठी नेमलेला तज्ञ - ....................

**प्र. २ ब) दिलेल्या कारणापैकी योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.**

१) म्यानमारवर कब्जा मिळवणे हे ब्रिटीशांचे उद्दिष्ट होते कारण –

अ) ब्रिटिशांनी साम्राज्यविस्तार करावायचा होता

ब) म्यानमारमधील नैसर्गिक साधनसंपत्ती आणि बाजारपेठ यावर ताबा मिळवणे ब्रिटीशांच्या दृष्टीने महत्त्वाचे होते.

क) ब्रिटिशांना युरोपीय वसाहतवादी स्पर्धेत पुढे राहायचे होते.

ड) म्यानमारचा राजा थिबाला धडा शिकवायचा होता.

२) युरोपीय व्यापाऱ्यांना आशिया आफ्रिकेतील प्रदेशांचे आकर्षण होते.कारण –

अ) या प्रदेशात सोने हिरे चांदी कोळसा इ. नैसर्गिक साठे मोठ्या प्रमाणावर होते.

ब) या खंडातील लोकांचे आकर्षण होते.

क) वसाहतवादी स्पर्धेत पुढे राहायचे होते.

ड) ज्ञानाचा प्रसार करावयाचा होता.


**प्रश्न ३ अ] पुढील नकाशाचे निरीक्षण करून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा**





१. वरील वसाहती उत्तर अमेरिका खंडात आहेत की दक्षिण अमेरिका खंडात हे स्पष्ट करा.
२. वरील वसाहती अमेरिकेच्या कोणत्या किनारपट्टीवर स्थित आहेत?
३. या वसाहतींच्या पूर्वेकडे कोणता महासागर आहे?
४. नकाशात दिसणाऱ्या बोस्टन या बंदराशी संबंधित कोणती घटना आहे?
५. फिलाडेल्फिया या शहराशी अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धातील कोणती महत्त्वाची घटना निगडीत आहे?

**प्रश्न ३ ब ] संकल्पना चित्र पूर्ण करा :**


१.




**२. वसाहतवादाची साखळी स्पष्ट करा -**



३.




**प्रश्न ४ अ ] टीपा लिहा.**

१. वसाहतवाद
२. वसाहतवादाचे परिणाम
३. अमेरिकेतील स्पॅनिश वसाहती
४. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध
५. १८८४ ची बर्लिन परिषद

**प्रश्न ४ ब] पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. औद्योगिक क्रांतीमुळे वसाहतवादाला चालना मिळाली.
२. युरोपीय राष्ट्रांनी अमेरिकेत वसाहती स्थापन केल्या.
३. ब्रिटीश साम्राज्यावरील सूर्य कधी मावळत नव्हता असे म्हणले जावू लागले.
४. युरोपीय राष्ट्रांनी आफ्रिका खंडात वसाहती स्थापन केल्या.

**प्रश्न ५ तुमचे मत नोंदवा.**

१. वसाहतवादामुळे भारतीयांचे मानसिक खच्चीकरण झाले.
२. युरोपीय देश वसाहती स्थापन करण्यात आघाडीवर होते.
३. वसाहतवादाचा परिणाम म्हणून वसाहतीत स्वातंत्र्य चळवळींचा उदय झाला.
४. अमेरिकन वसाहतीमुळे स्पेनची भरभराट झाली.
५. अमेरिकेत निर्वसाहतीकरणाची प्रक्रिया भारताच्या आधी कित्येक वर्षे सुरू होऊन त्यांना स्वातंत्र्य मिळाले
६. ब्रिटीश भारताच्या शेजारी राष्ट्रातील घडामोडींवर लक्ष ठेवून होते.( म्यानमार , नेपाळ , भुटान, सिक्कीम)

**प्रश्न ६ पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१ . अमेरिकन स्वातंत्र्य युद्धातील घटना स्पष्ट करा.
२ . ब्रिटिशांच्या आफ्रिकेतील वसाहतींची माहिती लिहा

**प्रश्न ७ खालील दिलेल्या मुद्यांच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा.**

१. ब्रिटीश – म्यानमार संबंध स्पष्ट करा
अ. ब्रह्मी युद्धे ब. थिबा राजा क. परिणाम
२. ब्रिटिशांच्या आशिया खंडातील देशांशी संबंधांवर टीप लिहा.
अ. नेपाळ ब. भुटान क. तिबेट

# पाठ ३ भारत आणि युरोपीय वसाहतवाद

**प्र.१) अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा.**

१) संपूर्ण समुद्रामार्गे भारतात येणारा पहिला प्रवासी__________ हा होय.

अ) वास्को-दा-गामा ब) मार्को पोलो क) इब्न बतुता ड) कोलंबस

२ )लग्नात आंदण म्हणून पोर्तुगालच्या राजाने आपल्या राजकन्येला ___________ हे बेट दिले.

अ) सुरत ब) कोझीकोडे क) मुंबई ड) हुगळी

३ ) डचांची भारतातील पहिली वसाहत_____________ येथे स्थापना झाली.

अ) दिल्ली ब) गोवा क) मद्रास ड) मच्छलीपट्टण

४ . इंग्लंडच्या ___________ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीला पूर्वेकडील देशांशी व्यापार करण्याचा परवाना दिला.

अ) दुसऱ्या चार्ल्सने ब)एलिझाबेथ राणीने क) पंचम जॉर्जने ड) विल्यमने

५ . १७४४ ते १७६३ या काळात __________ यांच्यात तीन युद्धे झाली, त्यांना कर्नाटक युद्धे म्हणतात .

अ) इंग्रज – फ्रेंच ब) इंग्रज – मराठे क) इंग्रज – पोर्तुगीज ड) इंग्रज – हैदर

६. १६६४ मध्ये फ्रान्सचे _________कोल्बेर यांच्या पुढाकाराने फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली.

अ) राजे ब) प्रधानमंत्री क)अर्थमंत्री ड) संरक्षणमंत्री

**प्र. १ ब) पुढील संचामधील ब गटामधील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१ )

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) दुसऱ्या चार्ल्सने मुंबईला नेमलेला पहिला गव्हर्नर - | अब्राहम शिपमन |
| २) पोर्तुगिज राजकन्या - | ब्रॅगांझा |
| ३) कालीकतचा राजा- | झामोरीन |
| ४) १७व्या शतकात स्वत:चे आरमार असणारा एकमेव भारतीय राजा- | छ. शिवाजीमहाराज |

२ )

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १) अर्सबिश्पू | मुख्य धर्मगुरू |
| २) शान्सेलर | न्यायाधीश |
| ३) वेदोर द फजेंद | मालमत्तेवरील अधिकारी |
| ४) कपितांव | कॅप्टन |

**प्र.२) अ) नावेलिहा.**

१) इ.स. १६६५मध्ये मोगल बादशाह औरंगजेब याच्या कडेसूर ते लावखार उघडण्याची परवानगी मागणारी यूरोपीयन व्यापारी कंपनी -

२) पूर्व किनारपट्टीवर फ्रेंचांचे मुख्य ठाणे-

३) ईस्ट इंडीया कं. नेमद्रासला बांधलेला किल्ला -

४) कोचीच्या राजाशी तह करुन काळ्या मिरीची निर्यात करण्याचा एकाधिकार मिळवणारी युरापीयन कंपनी -

**प्र.२) ब) दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.**

१) इंग्रजांनी आपल्या सुरत, कारवार, चेन्नई आणि मुंबई, इ. वखारीत बागा उभारल्या -

१) मनोरंजन किंवा वखारीतील श्रमिकांच्या श्रमपरिहारासाठी.

२) त्यांना फुले हवीहोती.

३) त्यांना फुलांपासून औषधी बनवायची होती.

४) त्यांना फुलांचा व्यापार करायचा होता.

२ ) १७व्या शतकाच्या सुरुवातीला मुघल, आदिलशाही आणि कुतूबशाही जहाजांना डचांकडून परवाना घ्यावा लागे-

१) परवाना न घेता प्रवास केल्यास जहाज जप्त केले जायचे.

२) मुघलांना जहाज बाळगणे परवडत नव्हते.


३) या प्रदेशावर मुघलांची सत्ता होती.

४) या प्रदेशावर कुतूबशाहीची सत्ता होती.


प्र.३ अ ) या प्रकरणात नकाशा नाही. त्यामुळे नकाशावरील प्रश्न नाहीत.

**प्र.३ ब) संकल्पना चित्रेपर्णकरा.**

१)




२)




**प्र.४ अ ) टीपा लिहा.**

१ ) पोर्तुगिजांची युध्दनिती.

२) पोर्तुगीजांचा भारतातील व्यापार

**प्र.४ ब ) खालील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१) भारतीय सत्ताधिशांना कार्ताझ घेणे गरजेचेहोते.

२) पोर्तुगिजांशी लढा देणे भारतीयांना अवघड झाले होते.

३) इंग्लंडच्या चार्ल्स राजाने मुंबई बेट ईस्ट इंडीया कंपनीला भाड्याने दिले.

४) पोर्तुगीज ,दमण, वसई, आणि गोवा येथे जहाजे बांधत .

**प्रश्न ५ आपले मत नोंदवा**

१. भारतात आलेल्या युरोपीय सत्तांनी धर्मप्रसार केला.

२. भारतातील स्थानिक सत्ताधीशांनी युरोपीयनांना वखारी बांधायला परवानगी देवून अदूरदृष्टि दाखविली

३. युरोपीय सत्तांनी भारताच्या भूमीवर आपापसात युद्धे केली.

**प्र.६ ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) डच सरकारने युनायटेड ईस्ट इंडीया कं. ला कोणकोणते अधिकार दिले?

२)ब्रिटिश ईस्ट इंडिया कं. ने भारतात वखार स्थापन करण्याचा निर्णय का घेतला?

**प्रश्न ७ खालील दिलेल्या मुद्यांच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा.**

१. भारतातील पोर्तुगीज वखारींची माहिती लिहा

अ. वसाहतीची ठिकाणे ब. वखारीतील अधिकारी

२. भारतातील ब्रिटीश  वखारींची माहिती लिहा

अ. वसाहतीची ठिकाणे ब. वखारीतील अधिकारी

---

## पाठ ४ – वसाहतवाद आणि मराठे

**प्रश्न १ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा**

१. इब्राहीमखानाने पानिपतच्या युद्धात केलेल्या पराक्रमाने प्रभावित होवून ________ यांनी फ्रेंच प्रशिक्षकांच्या मदतीने आधुनिक कवायती फौज तयार केली.

अ. महादजी शिंदे ब. मल्हारराव होळकर क. सदाशिवरावभाऊ ड. राघोबादादा

२. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकासाठी ___________ हा इंग्रज वकील उपस्थित होता .

अ. हेन्री रेव्हिंग्टन ब. फिलिफ गिफर्ड क. हेन्री ऑक्झिंडेन ड. रिचर्ड टेलर

३. मराठ्यांनी पोर्तुगीजांना __________ च्या वेढ्यात पराभूत केले .

अ. वेंगुर्ला ब. फोंडा क. सुरत ड. राजापूर

४. पानिपतचे तिसरे युद्ध मराठे आणि ________ यांच्यात झाले .

अ. इंग्रज ब. अब्दाली क. अहमदखान बंगश ड. नजीबखान

५. थोरल्या बाजीराव पेशव्यांचे बंधू चिमाजीअप्पा यांनी वसई येथे ________ यांचा पराभव केला.

अ. इंग्रज ब. फ्रेंच क. डच ड. पोर्तुगीज

**प्र. १ ब. पुढील संचातील 'ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा**

१]

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| १) कास्मो -द- ग्वार्द | पोर्तुगीजइतिहासकार |
| २) गोंसालूमार्तीस | पोर्तुगीजवकिल |
| ३) फ्रास्वाँमर्टिन | पोंडिचेरीचागव्हर्नर |
| ४) हेन्रीरेव्हिग्टंन | इंग्रजअधिकारी |

२]

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| १) येसाजी कंक - | मराठ्यांच्या पायदळाचे प्रमुख |
| २) गोंसालूमार्तीस - | पोर्तुगीजवकिल |
| ३) डिबॉईन - | पोंडिचेरीचागव्हर्नर |
| ४) हेन्रीरेव्हिग्टंन - | इंग्रजअधिकारी |

**प्र.२) अ) ऐतिहासिक ठिकाण,व्यक्ती, घटना या संबंधीची नावे लिहा.**

१) जैतापूरचा इंग्रज दलाल -

२) अफझलखानच्या भेटीपूर्वी मराठ्यांनी हे बंदर जिंकून घेतले -

३) पाँडिचेरीचा गव्हर्नर जनरल –

४) भारतात सर्वप्रथम आलेले युरोपीय–

५) १७९५च्या खर्डा लढाईत मराठ्यांनी यांचा पराभव केला-

**प्र.२) ब) दिलेल्याकारणांपैकीयोग्यकारणनिवडूनविधानेपूर्णकरा.**

१). छत्रपती शिवाजी महाराजांनी मिठाच्या व्यापारावर संरक्षक जकाती उभारल्या कारण -

अ) पोर्तुगिजांना विरोधकरून स्थानिक मीठ व्यापाराला संरक्षण देण्यासाठी

ब) इंग्रजांचा मिठाचा व्यापार मोडून काढण्यासाठी.

क) स्वराज्यात पैसा उभारण्यासाठी.

ड) वसाहतवाद्यांना विरोध करण्यासाठी.

२) छत्रपती राजाराम महाराज आणि महाराणी ताराबाई यांच्या काळात पाश्चात्त्य शत्रूंकडे दुर्लक्ष झाले कारण-

अ ) त्यांच्याकडे पुरेसे सैन्याबळ नव्हते

ब) त्यांच्या कारभाऱ्यांनी त्यांना तसा सल्ला दिला होता

क) त्यांना आपली सर्व शक्ती औरंगजेबाविरुद्ध एकवटावी लागली

ड) त्यांच्याकडे दूरदृष्टीचा अभाव होता.

**प्रश्न३ : (अ)पुढील नकाशाचे निरीक्षण करून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**




१. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील डच वसाहती कोणत्या?

२. पूर्व किनारपट्टीवर फ्रेंचांनी कोणत्या वसाहती उभारल्या?


३. आग्रा आणि अलाहाबाद येथे कोणाच्या वसाहती होत्या?

४. नकाशाच्या मदतीने मराठे सरदारांची उत्तरेतील महत्त्वाची ठाणी सांगा (उदा.- नागपूरचे भोसले)


५. मराठी सत्तेचा विस्तार उत्तरेकडील कोणत्या शहरापर्यंत झाला होता ?

**प्रश्न ३ ब ) पुढील संकल्पनाचित्रे पूर्ण करा**

१.




२. कालरेषा पूर्ण करा -



**प्रश्न ४ अ) टीपा लिहा**

१. छत्रपती शिवाजी महाराज आणि पोर्तुगीज संबंध

२. अफगाण आणि मराठे

३ . फ्रेंच आणि मराठे

४. छत्रपती संभाजी महाराज आणि पोर्तुगीज संबंध

**प्रश्न ४ ब) खालील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. भारतात जेथे पोर्तुगीज वसाहती होत्या, तेथील स्थानिक जनता असंतुष्ट होती.

२. छत्रपती शिवाजी महाराजांनी आरमार उभारले.

**प्रश्न ५ आपले मत नोंदवा**

१. एका अर्थाने, ब्रिटिशांनी भारत मराठ्यांकडून मिळवला.

२ . पोर्तुगीजांचे मराठ्यांविषयीचे धोरण लवचिक होते.

३ . मराठी सत्तेचे धोरण वसाहतविरोधी असल्याचे दिसून येते.

**प्रश्न ६ – सविस्तर उत्तरे लिहा**

१ . छत्रपती शिवाजी महाराजांचे मराठ्यांचे सार्वभौमत्त्व अबाधित राखण्याच्या धोरणाची माहिती लिहा

२. भारतातील सर्वांत प्रभावी अश्या मराठ्यांच्या सत्तेचा अस्त का झाला?

**प्रश्न ७ दिलेल्या मुद्यांच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा**

१. मराठे – इंग्रज संबंधांवर टीप लिहा.

(अ) विविध कालखंडातील मराठे शासक आणि इंग्रज संबंध (ब) मराठ्यांचे आरमार (क) इंग्रजांचे धोरण

२.पोर्तुगीज – इंग्रज संबंधांवर टीप लिहा.

(अ) छत्रपती शिवाजी महाराज आणि पोर्तुगीज (ब) छत्रपती संभाजी महाराज व पोर्तुगीज (क) पेशवे आणि पोर्तुगीज

## पाठ५ भारत - सामाजिक व धार्मिक सुधारणा

**प्रश्न १ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा**

१. राजाराममोहन रॉय यांनी ____________इंग्रजी भाषेत पत्र लिहिले.
अ. सतीप्रथेविरुद्ध ब. अस्पृश्यतेविरुद्ध क. बालविवाहाविरुद्ध ड. केशवपनाच्या प्रथेविरुद्ध
२. १८२९ मध्ये गव्हर्नर जनरल __________यांनी सतीप्रथा नष्ट केली.
अ. लॉर्ड डफरीन ब . लॉर्ड बेंटींक क. लॉर्ड डलहौसी ड. लॉर्ड वेलस्ली
३. . राजाराममोहन रॉय यांनी _______________ स्थापना केली.
अ. रामकृष्ण मिशनची ब. आर्य समाजाची क. प्रार्थना समाजाची ड. ब्राह्मो समाजाची
४ . महात्मा जोतीराव फुलेयांनी ___________ स्थापना केली.
अ. सत्यशोधक समाजाची ब. ब्राह्मो समाजाची क. आर्य समाजाची ड. प्रार्थना समाजाची
५. डिप्रेसड क्लासेस मिशनचीस्थापना _______यांनी केली.
अ. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ब. महात्मा फुले क. राजर्षी शाहू ड. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे
६ . मुरळी , जोगतिणी देवदासी यांच्या प्रश्नांच्याकडे समाजाचे लक्ष __________ यांनी वेधले.
अ. शिवराम जानबा कांबळे ब. कर्मवीर दादासाहेब गायकवाड क. गोपाळबाबा वलंगकर ड. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

**प्रश्न १ ब. पुढील संचातील 'ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा**

१]

| अ गट | ब गट |
|---|---|
| चवदार तळे सत्याग्रह – | नाशिक |
| सिंग सभा – | अमृतसर |
| वायकोम सत्याग्रह – | त्रावणकोर |
| आरक्षणाचा जाहीरनामा – | कोल्हापूर |

२]

| अ गट | ब गट |
|---|---|
| ब्राह्मो समाज – | राजाराममोहन रॉय |
| सत्यशोधक समाज – | महात्मा जोतीराव फुले |
| परमहंस सभा – | महर्षी विठ्ठल रामजी शिंदे |
| रामकृष्ण मिशन – | स्वामी विवेकानंद |

**प्रश्न २ अ –ऐतिहासिकठिकाण,व्यक्ती, घटनायासंबंधीचीनावेलिहा.**

१. . या समाजाने वेदांना पवित्र ग्रंथ मानले –
२. . स्वामी विवेकानंदांनी भारतीय तरुणांना दिलेला संदेश –
३ . अबुल फैज याने अकबराच्या प्रशासन पद्धतीवर लिहिलेला ग्रंथ –
४ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय तरुणांना दिलेला संदेश –

**प्रश्न २ ब – दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.**

१. राजा राममोहन रॉय यांनी सतीप्रथेविरुद्ध इंग्रजी भाषेत पत्र लिहिले कारण –
अ. वाहिनीला सती जावे लागले या प्रथेचा त्यांच्या मनावर खोलवर परिणाम झाला.
ब . त्यांना प्रसिद्धी हवी होती.
क. सरकारचे लक्ष त्यांना वेधून घ्यायचे होते.
ड. सती प्रथेविषयी त्यांना ब्रिटीशांना अवगत करायचे होते.


२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनेक वृत्तपत्रे सुरू केली कारण –
अ. त्यांना वृत्तपत्रांचा प्रसार करायचा होता.
ब. वृत्तपत्र हे समूह संपर्क माध्यम आहे.
क. त्यांनी वृत्तपत्रांकडे चळवळीचे एक साधन म्हणून पाहिले.
ड. वृत्तपत्र हे उत्पन्नाचे साधन होते.

प्रश्न ३ अ **या पाठात नकाशा नसल्याने हा प्रश्न या पाठात येत नाही.**


**प्रश्न ३ ब पुढील संकल्पनाचित्रे पूर्ण करा –**




२.




३.




४. पुढील तक्ता पूर्ण करा

| | |
|---|---|
| ब्राह्मो समाज | राजाराममोहन रॉय |
| आर्य समाज | -------------------- |
| -------------------- | स्वामी विवेकानंद |
| परमहंस सभा | -------------------- |
| -------------------- | डॉ. बाबासाहेब आंबेडकर |

**प्रश्न ४ अ  टीपा लिहा**

१. प्रार्थना समाज
२. आर्य समाज
३. रामकृष्ण मिशन
४. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे पुरोगामी धोरण
५. राजर्षी शाहू महाराजांचे धोरण

**प्रश्न ४ ब  खालील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. नवसमाजाची निर्मिती करणे समाजसुधारकांना आवश्यक वाटू लागले.
२. राजाराममोहन रॉय यांनी आधुनिकतेची पायाभरणी आपल्या लेखनातून केली.
३. ताराबाई शिंदे यांनी मांडलेली स्त्री-पुरुष समानतेची संकल्पना अत्यंत धाडसाची मानली जाते.

**प्रश्न ५  आपले मत नोंदवा**

१. सामाजिक आणि धार्मिक सुधारणांच्या अभावी राजकीय स्वातंत्र्य अपूर्ण असते.
२. बहुजन समाजाचे शिक्षण आणि स्त्रियांचे शिक्षण या क्षेत्रात महात्मा फुले यांचे योगदान अमूल्य आहे.
३. सामाजिक आणि धार्मिक सुधारणा चळवळीचे नेतृत्त्व नवशिक्षित तरुण वर्गाने केले.
४. सामाजिक सुधारणांमुळे राजकीय सुधारणांची पार्श्वभूमी तयार झाली.

**प्रश्न ६ – सविस्तर उत्तरे लिहा**

२. प्रार्थना समाजाची तत्त्वे स्पष्ट करा.
३. रामकृष्ण मिशनने केलेले कार्य स्पष्ट करा
४. सर सय्यद अहमद खान यांचे कार्य स्पष्ट करा
५. रामस्वामी नायकर यांचे कार्य स्पष्ट करा
६. महात्मा फुले यांचे कार्य स्पष्ट करा

**प्रश्न ७ – दिलेल्या मुददयांच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा**

१. राजाराममोहन रॉय यांनी कोणत्या सुधारणांचा आग्रह धरला?
अ. सामाजिक ब. धार्मिक
२ . डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य स्पष्ट करा
अ. सामाजिक ब. राजकीय

## पाठ६ वसाहतवादाविरुद्ध भारतीयांचा संघर्ष

**प्र. १ अ दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पुन्हा लिहा.**

१. राज्य खालसा करण्याचे धोरण ______________ या अधिकाऱ्याने अवलंबिले.

अ) लॉर्ड डलहौसी ब) लॉर्ड कर्झन क) लॉर्ड कॅनिंग ड) लॉर्ड औट्रॅम

२. नानासाहेब पेशवा यांनी ____________ येथील उठावाचे नेतृत्त्व केले.

अ) झाशी ब) पटणा क) कोल्हापूर ड) चितगाव

३. भारतीय राष्ट्रीय सभेच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष ___________ होते.

अ) द्वारकानाथ टागोर ब) व्योमेशचंद्र बॅनर्जी क) दादाभाई नौरोजी ड) सुरेन्द्रनाथ बॅनर्जी

४. राष्ट्रीय सभेमध्ये ____________ च्या अधिवेशनात फुट पडली

अ) मुंबई ब) लाहोर क) सुरत ड) पुणे

५. श्यामजी कृष्ण वर्मा यांनी लंडन येथे ___________ ची स्थापना केली.

अ) इंडिया हाऊस ब) गदर क) कम्युनिस्ट पार्टी ड) अभिनव भारत

६. महाराष्ट्रातील _____________ जिल्ह्यात क्रांतीसिंह नाना पाटील यांनी प्रतिसरकार स्थापन केले.

अ) कोल्हापूर ब) पुणे क)ठाणे ड) सातारा

**प्रश्न १ ब. पुढील संचातील 'ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा**

१]

| अ गट | ब गट |
|---|---|
| १. कुवरसिंह | लखनौ |
| २. नानासाहेब पेशवा | कानपूर |
| ३. राणी लक्ष्मीबाई | झाशी |
| ४. चिमासाहेब | कोल्हापूर |

२]

| अ गट | ब गट |
|---|---|
| १. अनुशीलन समिति | अरविंद घोष |
| २. गदर | लाला हरदयाल |
| ३. हिंदुस्तान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मी – | चंद्रशेखर आझाद |
| ४. अभिनव भारत - | श्यामजी कृष्ण वर्मा |

**प्रश्न २ अ – नावे लिहा –**

१. हंसाजीनाईक यांचे राज्य या प्रदेशात होते –

२. बंगालची फाळणी यांनी घडवून आणली –

३. १९४३ मध्ये आझाद हिंद सेनेने ब्रिटिशांकडून ही बेटे जिंकून घेतली –

४. विठ्ठल जव्हेरी, उषा मेहता, आणि त्यांच्या साथीदारांनी सुरू केलेले रेडियो केंद्र -

**प्रश्न २ ब – दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.**

१. ब्रिटिशांनी फोडा आणि राज्य करा हे धोरण अवलंबिले कारण -

अ) त्यांना भारतीयांशी मैत्री करायची होती.

ब) १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यादरम्यान दिसलेल्या भारतीयांच्या एकीमुळे त्यांचे डोळे उघडले

क) हे धोरण राबविण्याची आज्ञा ईस्ट इंडिया कंपनीने दिली.

ड) त्यांना भारतीय संस्थाने खालसा करायची होती.

२. भारतातील तरुणांनी कम्युनिस्ट पार्टीची स्थापना केली कारण –

अ) कामगार वर्गाची सत्ता प्रस्थापित करण्यासाठी

ब) भारतीय तरुणांना शिष्यवृत्ती देण्यासाठी

क) रौलेट कायद्याला विरोध करण्यासाठी


ड) भारतीयांना बॉम्ब तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी


**प्रश्न३ : (अ)पुढीलनकाशाचेनिरीक्षणकरूनदिलेल्याप्रश्नांचीउत्तरेलिहा.**




१. १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्याचे सध्याच्या पाकिस्तानातील कोणतेही एक केंद्र सांगा
२. १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्याचे सध्याच्या बांगलादेशातील कोणतेही एक केंद्र सांगा
३. १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्याचे सध्याच्या महाराष्ट्रातील कोणतेही एक केंद्र सांगा
४. ब्रिटिशांनी दत्तक विधान नामंजूर करून कोणती संस्थाने खालसा केली?
५. मंगल पांडे यांची कुठे नियुक्ती होती ?

**प्रश्न ३ ब पुढील संकल्पनाचित्रे पूर्ण करा –**




३. पुढील तक्ता पूर्ण करा –

| | |
|---|---|
| -------------------------------------- | जर्मनीतील स्टुटगार्ड येथे भारताचा ध्वज फडकावला |
| शांती घोष व सुनीती चौधरी | -------------------------------------------------- |
| ----------------------------------- | चितगाव शस्त्रागारावरील हल्यामुळे जन्मठेपेची शिक्षा |
| बीना दास | -------------------------------------------------- |

**प्रश्न ४ अ  टीपा लिहा**

१. उमाजी नाईकांचा उठाव
२ . मवाळ विचारसरणी
३ . लोकमान्य टिळकांचे प्रतियोगी सहकारितेचे धोरण
४ . अनुशीलन समिति
५ . इंडिया हाऊस
६ . आझाद हिंद सेना
७. भूमिगत चळवळ

**प्रश्न ४ ब  खालील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. ब्रिटीश सत्तेविरोधातील भिल्लांचे उठाव हळूहळू कमी होत गेले.
२ . रविंद्रनाथ टागोर यांनी सर या पदवीचा त्याग केला.
३. १८५८ मध्ये इंग्लंडच्या राणीने जाहीरनामा प्रसिद्ध केला.
४.  गांधीजींनी सविनय कायदेभंग चळवळी साठी मिठाचा प्रतीकात्मक वापर केला.

**प्रश्न ५  आपले मत नोंदवा**

१ . ब्रिटिशांच्या सत्तेच्या परिणामस्वरूप भारतीय शेतीचा ऱ्हास झाला.
२ . १८५७ च्या लढ्यात भारतीयांना अपयश आले.
३ . स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या मते, १८५७ चा उठाव हे भारतीयांचे पहिले स्वातंत्र्ययुद्ध होते.
४ . भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना हा भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील महत्त्वाचा टप्पा होता.
५.वसाहतवादाचा उदय हा युरोपियन राष्ट्रांच्या व्यापारवृद्धीचा परिणाम होता.

**प्र. ६  सविस्तर उत्तरे लिहा**

१. १८५७ च्या उठावाची कारणे स्पष्ट करा.
२. भारतीय राष्ट्रीय सभेच्या आधीच्या विविध संघटनांची माहिती लिहा.

**प्र. ७  दिलेल्या मुद्यांच्या आधारे उत्तरे लिहा.**

१ . १८५७ पूर्वीच्या उठावाची माहिती लिहा.
अ ) भिल्ल ब ) रामोशी क ) गडकरी
२ . ब्रिटीश सत्तेविरोधात क्रांतिकारी चळवळीची माहिती सांगा.
अ ) उद्दिष्टये ब ) विविध संघटना व त्यांचे कार्य क ) परिणाम
३ . गांधीजींच्या नेतृत्त्वाखालील अहिंसक चळवळ स्पष्ट करा.
अ ) चंपारण्य चळवळ आणि रौलेट कायदा ब ) असहकार आंदोलन क ) छोडो भारत

---

## प्रकरण : ०७ भारत : निर्वसाहतीकरण ते एकीकरण

**प्रश्न १ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण विधाने पुन्हा लिहा.**

(१) गोवा येथे इ.स. १९४६ मध्ये ........... यांच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंगाचे आंदोलन झाले.

(अ) डॉ. राम मनोहर लोहिया (ब) डॉ. टी. बी. कुन्हा
(क) डॉ. पी. पी. शिरोडकर (ड) डॉ. राम हेगडे

(२) हैदराबाद संस्थानाच्या मुक्तिलढ्याचे नेतृत्व .......... यांनी समर्थपणे केले.

(अ) राजा हरिसिंग (ब) स्वामी रामानंद तीर्थ
(क) पंडित महादेवशास्त्री जोशी (ड) केशवराव जेधे

(३) भारतामध्ये .......... यांच्या प्रयत्नामुळे अनेक संस्थाने विलीन झाली.

(अ) जयंतराव टिळक (ब) सरदार वल्लभभाई पटेल
(क) पंडित जवाहरलाल नेहरू (ड) डॉ. टी. बी. कुन्हा

(४) भारतातील ........... हे सर्वात मोठे संस्थान होते.

(अ) हैदराबाद (ब) जुनागढ
(क) सातारा (ड) भरतपूर

(५) भारतीय राज्यघटनेच्या ........... कलमान्वये जम्मू काश्मीरला विशेषराज्याचा दर्जा प्रदान करण्यात आला.

(अ) ३८० (ब) ३७७
(क) ४२० (ड) ३७०

(६) जुनागढ हे ........... मधील एक संस्थान होते.

(अ) कर्नाटक (ब) गुजरात
(क) काश्मीर (ड) महाराष्ट्र

**(ब) पुढील संचामधील 'ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून पुन्हा लिहा.**

**(१)**

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| I. हैदराबाद संस्थानाचे विलीनीकरण | - स्वामी रामानंद तीर्थ |
| II. काश्मीर संस्थानाचे विलीनीकरण | - शेख अब्दुल्ला |
| III. गोवा मुक्तिलढ्यातील मोलाचे योगदान | – मोहन रानडे |
| IV. पुदुच्चेरी येथील कामगार नेते | - व्ही. सुबय्या |

**(२)**

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| I. गोवा कॉंग्रेसचे प्रमुख | - डॉ. टी. बी. कुन्हा |
| II. आझाद गोमंतक संघटनेचे नेते | - फ्रान्सिस मस्कारन्हीस |
| III. गोवा विमोचक सहायक समितीचे नेतृत्व | - ना. ग. गोरे |
| IV. हैदराबाद स्टेट कॉंग्रेसची स्थापना | - सेनापती बापट |

**प्रश्न २ (अ) ऐतिहासिक ठिकाण / व्यक्ती / घटना संबंधी नावे लिहा.**

(१) भारत स्वतंत्र झाला त्यावेळी भारतात विलीन न झालेले संस्थान -

(२) गोवा कॉंग्रेस कमिटीचे प्रमुख –

(३) कासीम रझवी यांची संघटना –

(४) ऑपरेशन पोलो मोहीम राबविलेले संस्थान –

(५) मराठा दैनिकातून गोवा मुक्ती लढ्याला बळ देणारी व्यक्ती –

(६) गोवा मुक्तिसाठी सैनिकांनी वापरलेले सांकेतिक नांव –

**(ब) दिलेल्या कारणांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) जुनागढचा नबाब पाकिस्तानला पळून गेला. कारण –

(अ) संस्थानातील प्रजेने त्यांच्या निर्णयाला विरोध करून आंदोलन उभे केले होते.

(ब) संस्थानातील प्रजा त्याला कैद करणार होती.

(क) संस्थानातील जनतेचा नबाबावर विश्वास नव्हता.

(ड) नबाबाच्या संरक्षणासाठी पाकिस्तान तयार होते.

(२) बहुसंख्य संस्थाने स्वतंत्र भारतात विलीन झाली. कारण-

(अ) संस्थानिकांना तनखा दिला जाणार होता.

(ब) संस्थानिकांना मान्य होईल असा सामिलानामा तयार केला होता.

(क) भारताकडून संस्थानिकांना अधिकार अबाधित ठेवण्याचे आश्वासन देण्यात आले होते.

(ड) संस्थानिकांना मोठी बक्षिसे देण्यात येणार होती.

(३) राजा हरिसिंग यांनी जम्मू काश्मीर संस्थान भारतात विलीन करण्याची परवानगी दिली. कारण-

(अ) संस्थानातील जनतेचा उठाव मोडून काढायचा होता.

(ब) काश्मीरचा कारभार स्वतंत्रपणे करणे शक्य नव्हते.

(क)पाकिस्तानातील सशस्त्र टोळयांचे आक्रमण परतवणे शक्य नव्हते.

(ड) राज्यावर कर्जाचा बोजा प्रचंड वाढला होता.

(४) डॉ. राम मनोहर लोहिया यांना पोर्तुगीज सरकारने गोव्यातून हदद्पार केले. कारण –

(अ) त्यांनी सविनय कायदेभंग आंदोलन केले होते.

(ब) त्यांनी क्रांतीकारी संघटना स्थापन केली होती.

(क) त्यांनी सशस्त्र बंडाळी उभी केली होती.

(ड) त्यांनी पोर्तुगीजांविरोधी तिरंगा फडकवला होता.

प्रश्न ३ (अ) पुढील नकाशाचे निरीक्षण करून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

(अभ्यासण्यासाठी पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ५६ वरील नकाशा पहा.)

(१) भारताच्या वायव्य दिशेकडे कोणते राष्ट्र आहे.?

(२) कारिकलमध्ये कोणाची सत्ता होती.?


(३) कराची हे शहर कोणत्या देशात आहे.?

(४) भारताच्या पश्चिम किनारपटटीवर फ्रेंचांची सत्ता कोठे होती.?


(५) भारताच्या दक्षिणेस कोणता समुद्र आहे.?

**(ब) दिलेली संकल्पना चित्रे पूर्ण करा.**


(१)




२)




**पुढील कालरेषा पूर्ण करा.**



**प्रश्न ४ (अ) टीपा लिहा.**

(१) निर्वसाहतीकरण
(२) सामीलनामा
(३) ऑपरेशन पोलो
(४) ऑपरेशन विजय

**(ब) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले.
(२) पुदुच्चेरी हा केंद्रशासित प्रदेश बनला.
(३) जुनागढ संस्थान भारतात विलीन झाले.
(४) काश्मीर वादास आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले.

**प्रश्न ५ : तुमचे मत नोंदवा.**

(१) काश्मीर वादास आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले.
(२) भारताला संस्थानांचे विलीनीकरण करणे गरजेचे होते.
(३) गोव्यात पोर्तुगीज सत्ता १९६१ पर्यंत अखंड होती.
(४) हैदराबाद संस्थानामध्ये आंध्र, कर्नाटक, महाराष्ट्र परिषदांची स्थापना झाली.

**प्रश्न ६ : सविस्तर उत्तरे लिहा.**

(१) गोवा विलीनिकरणाचे स्वरूप स्पष्ट करा.
(२) दादरा-नगर हवेलीमधील जनतेने पोर्तुगीजांना का विरोध केला.
(३) व्ही. सुबय्या यांनी पुदुच्चेरी येथील लोकांना का संघटीत केले.

**प्रश्न ७ : खालील प्रश्नांची दिलेल्या मुदद्यांच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा.**

(१) हैदराबाद मुक्तिसंग्रामाची माहिती लिहा.
(अ) स्वामी रामानंद तीर्थ यांचे योगदान (ब) रझाकार संघटना

(२) गोवा मुक्ती संग्रामाचे स्वरूप –
(अ) गोवा कॉंग्रेसची स्थापना (ब) गोवा मुक्तीचा लढा
(क) लष्करी कार्यवाही

(३) जम्मू काश्मीर संस्थान भारतात विलीनिकरणाची प्रक्रिया लिहा.
(अ) पाकिस्तानचे आक्रमण (ब) सशस्त्र टोळ्या
(क) राजा हरीसिंग यांची भूमिका (ड) विलीनीकरण

## प्रकरण : ८ जागतिक महायुदधे आणि भारत

**प्रश्न १ (अ) दिलेल्या पर्यांयापैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा.**

(१) ऑस्ट्रियाने सर्बियाविरूदध युदध पुकारले तेव्हा -------- देश सर्बियाच्या मदतीला धावून गेला.

(अ) जर्मनी (ब) अमेरिका (क) हंगेरी (ड) रशिया

(२) हिटलरच्या ----------- पक्षाने जर्मनीमध्ये सत्ता मिळविली.

(अ) लोकशाही (ब) साम्यवादी

(क) नाझी (ड) फॅसिस्टवाद

(३) जर्मन सैन्यांचा ------------ पराभव केल्यामुळे हिटलरला आत्महत्या करावी लागली.

(अ) रशियाने (ब) इंग्लंडने

(क) अमेरिकने (ड) पोलंडने

(४) अमेरिकेने --------------- या शहरावर पहिला अणुबॉम्ब टाकला.

(अ) नागासकी (ब) हिरोशिमा

(क) पर्लहार्बर (ड) स्टलीन्ग्राड

(५) भारत महायुदधात सहभागी झाल्याची एकतर्फी घोषणा ----------- यांनी केली.

(अ) व्हाईसरॉय चेम्सफर्ड (ब) लॉर्ड लिनलिथगो

(क) लॉर्ड कर्झन (ड) लॉर्ड मिंटो

**(ब) पुढील प्रत्येक संचामधील 'ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

**(१)**

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| I अमेरिका | - वुड्रो विल्सन |
| II इंग्लंड | - विन्स्टन चर्चिल |
| III जर्मनी | - हिटलर |
| IV इटली | - लिनलिथगो |

**(२)**

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| I केसरी वृत्तपत्र | - लोकमान्य टिळक |
| II आझाद हिंद सेनेचे नेतृत्व | - रासबिहारी घोष |
| III व्हिक्टोरिया क्रॉसने सन्मानित | - पहिले महायुदध काळात दिलेले शौर्य पदक |
| IV कामा गाटा मारुचे नेतृत्व | - बाबा गुरुदितसिंग |

**प्रश्न २ (अ) ऐतिहासिक ठिकाण / व्यक्ती / घटना संबंधी नावे लिहा.**

(१) पहिल्या महायुदधात इंग्लंड, फ्रान्स, रशिया राष्ट्रांचा गट –

(२) पहिले महायुदध या तहाने संपले -

(३) पहिल्या महायुदधात जर्मनी, ऑस्ट्रिया, तुर्कस्तान, बल्गेरिया राष्ट्रांचा गट –

(४) जपानने अमेरिकेचा निकामी केलेला नाविक तळ –

(५) दुसऱ्या महायुदधानंतर स्थापन झालेले आंतरराष्ट्रीय संघटना –

**(ब) दिलेल्या कारणांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) पहिल्या महायुदधानंतर राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली. कारण-

(अ) युदधाला चेतावणी देण्यासाठी.

(ब) वसाहतींवर आपले वर्चस्व प्रस्तापित करण्यासाठी.

(क) जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी.

(ड) अमेरिकेला युदधापासून दूर ठेवण्यासाठी.

(२) दुसऱ्या महायुदधात अमेरिका उतरली. कारण-

(अ) जर्मनीने अमेरिकेच्या वसाहती जिंकल्या होत्या.

(ब) अमेरिकेवर कर्जाचा डोंगर वाढला होता.

(क) जपानने पर्लहार्बर नाविक तळावर बॉम्ब टाकून निकामी केले होते.

(ड) अमेरिकेच्या मित्र राष्ट्रांनी युदधात उतरण्याचा आग्रह केला होता.

(३) युरोपियन राष्ट्रांना नवीन प्रदेश काबीज करण्याची गरज निर्माण झाली. कारण-

(अ) युरोपियन राष्ट्रांत लोकसंख्या वाढली होती.

(ब) युरोपियन राष्ट्रांना कच्चा माल आणि हक्काची बाजारपेठ आवश्यक होती.


(क) युरोपियन राष्ट्रांना धर्माचा प्रचार प्रसार करायचा होता.

(ड) युरोपियन राष्ट्रांना अमेरिकेवर दहशत निर्माण करायची होती.


प्रश्न ३अ पुढील नकाशाचे निरीक्षण करून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.( या पाठात नकाशा नसल्यामुळे प्रश्न विचारले जाणार नाहीत)

**(ब) दिलेली संकल्पना चित्रे पूर्ण करा.**

(१)




(२)



**प्रश्न ४ (अ) टीपा लिहा.**

(१) राष्ट्रसंघ

(२) आझाद हिंद सेना

(३) पहिले महायुदधाचे तात्कालिक कारण

(४) पहिल्या महायुदधाचे भारतावरील संमिश्र परिणाम

**(ब) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) भारताला दोन्ही महायुदधात सहभागी व्हावे लागले.

(२) इंग्लंडने भारतातून काढता पाय घेण्याचा निर्णय घेतला.

(५) अमेरिकेने जपानच्या भूमीवर पहिला अणुबॉम्ब टाकला.

(६) पहिले जागतिक महायुदध सुरु झाले.

(७) दुसरे महायुदध संपताच निर्वसाहतीकरणास सुरुवात झाली.

(८) जागतिक महायुदधामध्ये भारत सहभागी झाला.

(९) राष्ट्रसंघाला अपयश आले.

(१०) हिटलरने पोलंडवर हल्ला केला.

**प्रश्न ५ : तुमचे मत नोंदवा.**

(१) विसाव्या शतकात निर्वसाहतीकरण सुरु झाले.

(२) राष्ट्रसंघाला आलेल्या अपयशाची माहिती लिहा.

(३) पहिल्या महायुदधाच्यावेळी भारत संरक्षण क्षेत्रात मागास होता.

**प्रश्न ६ : सविस्तर उत्तरे लिहा.**

(१) दुसऱ्या महायुदधाची कारणे लिहा.

(२) भारतीय लोक राष्ट्रीय चळवळीत मोठ्या संख्येने का सहभागी झाले.

(३) दुसऱ्या महायुदधाचे भारतावरील परिणाम स्पष्ट करा.

(४) मॉन्ट-फर्ड सुधारणा कायद्यातील तरतुदी लिहा.

प्रश्न ७ : **खालील प्रश्नांची दिलेल्या मुदद्यांच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा.**

(१) पहिल्या महायुद्धाची माहिती लिहा .

(अ) साम्राज्यवादी धोरण (ब) तात्कालिक कारण

(क) राष्ट्रसंघाची स्थापना

(२) दुसरे महायुदध याविषयी माहिती लिहा.

(अ) महायुदधाची कारणे (ब) महायुदधाची वाटचाल

(क) महायुदधात जपानचा प्रवेश (ड) महायुदधाचा शेवट

(३) जागतिक महायुदधे आणि भारत यावर टिपण लिहा.

(अ) बेकारीत वाढ (ब) युदधात सहभाग (क) राष्ट्रीय सभेची भूमिका

## प्रकरण : ०९ जग : निर्वसाहतीकरण

**प्रश्न १ (अ) दिलेल्या पर्यांयापैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा.**

(१) पहिल्या महायुदधात ----------- व तुर्कस्तान या राष्ट्रांचा पराभव झाला.

(अ) अमेरिका (ब) फ्रान्स

(क) इंग्लंड (ड) जर्मनी

(२) १९३५ मध्ये ---------- भारतापासून वेगळा करण्यात आला.

(अ) म्यानमार (ब) श्रीलंका

(क) मालदीव (ड) इराण

(३) १९४७ मध्ये पहिली ------------- परिषद भरवली गेली.

(अ) ऐक्य (ब) आशियाई

(क) अटलान्टिक (ड) मँचेस्टर

(४) इंडोनेशियातील ---------- येथे पहिली आशियाई व आफ्रिकन राष्ट्रांची परिषद भरली.

(अ) शिंगापूर (ब) काटमांडू

(क) बांडुंग (ड) मँचेस्टर

(५) मुसोलिनी हा ------------ चा हुकुमशहा होता.

(अ) जर्मनी (ब) इटली

(क) इथिओपिया (ड) इंग्लड

**(ब) पुढील प्रत्येक संचामधील 'ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

**(१)**

| | **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|---|
| I. | बांडुंग | - बांडुंग परिषद |
| II. | पॅरिस | - १९१९ मधील पहिली अखिल आफ्रिका ऐक्य परिषद |
| III. | लंडन | - १९०० मधील पहिली अखिल आफ्रिका ऐक्य परिषद |
| IV. | मँचेस्टर | - आशियाई ऐक्य परिषद |

**(२)**

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| I एच. एस. विल्यम्स | - आफ्रिका ऐक्याचा विचार |
| II मुहम्मद ठाकूरफानु अल आझम – | मलबार येथील सुलतान |
| III महात्मा गांधी | - श्रीलंका येथील स्वातंत्र्य चळवळ |
| IV ऑगसॅन | - बर्मा इंडीपेन्डन्स आर्मीचे नेतृत्व |

**प्रश्न २ (अ) ऐतिहासिक ठिकाण / व्यक्ती / घटना संबंधी नावे लिहा.**

(१) ब्रिटिशांनी म्यानमारच्या उपाध्यक्ष पदी नेमलेला नेता –

(२) निर्वसाहतीकरणास चालना देण्यास कारणीभूत असलेली सनद -

(३) दुसऱ्या महायुदधाच्या वेळी ब्रिटनचे पंतप्रधान –

(४) मालदीव येथे हवाई तळ व रेडिओ केंद्र उभा करणारे –

(५) १९४५ साली आफ्रिका खंडातील नेत्यांनी भरविलेल्या परिषदेचे ठिकाण –

**(ब) दिलेल्या कारणांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) दुसऱ्या महायुदधकाळात आफ्रिकेतील स्वातंत्र्य चळवळ अधिक तीव्र झाली. कारण –

(अ) आफ्रिकेतील वसाहतींनी परकीयांचे वर्चस्व झुगारून टाकले.

(ब) आफ्रिकेत पाश्चात्य शिक्षण पदधती होती.

(क) दुसऱ्या महायुदधकाळात इंग्रज व फ्रेंचांनी वसाहतींना काही अधिकार द्यायला सुरुवात केली.

(ड) पाश्चात्य देश दुसऱ्या महायुदधात गुंतले होते.

(२) दुसऱ्या महायुदधकाळात आफ्रिकेतील ब्रिटीश वसाहतींना धोका निर्माण झाला. कारण-

(अ) ब्रिटीश वसाहतींना स्वातंत्र्य हवे होते.

(ब) युरोपातील सर्व राष्ट्रांनी वसाहतींवर आक्रमण केले होते.

(क) जर्मनीच्या सेनापतीने ब्रिटीश वसाहतींवर आक्रमण केले होते.

(ड) राष्ट्रसंघाने सर्वांना वसाहती सोडून जाण्यास सांगितले होते.


प्रश्न ३अ पुढील नकाशाचे निरीक्षण करून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.( या पाठात नकाशा नसल्यामुळे प्रश्न विचारले जाणार नाहीत)

**(ब) दिलेली संकल्पना चित्रे पूर्ण करा.**


(१)




(२)




(३)



**प्रश्न ४ (अ) टीपा लिहा.**

(१) आफ्रिकेतील जर्मन वसाहती

(२) बांडुंग परिषद

(३) आफ्रिका ऐक्य संकल्पना

**(ब) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) ब्रिटीश आणि ब्रह्मदेश यांच्यात तीन युदधे झाली.

(२) दुसरे महायुदध संपताच निर्वसाहतीकरणास अधिक वेग आला.

(३) निर्वसाहतीकरणास सुरुवात झाली.

(४) आफ्रिकेत राष्ट्रवादास सुरुवात झाली.

(५) म्यानमारचे एकत्रीकरण करण्यात आले.

**प्रश्न ५ : तुमचे मत नोंदवा.**

(१) विसाव्या शतकात निर्वसाहतीकरणास सुरुवात झाली.

(२) वसाहतींवर चांगले वाईट परिणाम झाले.

(३) दुसरे महायुदधानंतर निर्वसाहतीकरणास सुरुवात झाली.

(४) अटलांटिक सनदेमुळे जगातील लोकांना स्वयं निर्णयाचा हक्क मिळाला.

**प्रश्न ६ : सविस्तर उत्तरे लिहा.**

(१) अटलांटिक सनदेचे स्वरूप स्पष्ट करा.

(२) आफ्रिकेत स्वातंत्र चळवळ तीव्र झाली होती.

(३) म्यानमारच्या स्वातंत्र्याची माहिती लिहा.

**प्रश्न ७ : खालील प्रश्नांची दिलेल्या मुदद्यांच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा.**

(१) आशिया खंडातील निर्वसाहतीकरणाची माहिती लिहा.

(अ) मालदीव (ब) श्रीलंका

(क) म्यानमार / ब्रह्मदेश

(२) पहिले महायुदध आणि आफ्रिकेतील वसाहती संबंधी धोरण -

(अ) विजयी राष्ट्रांची भूमिका (ब) विड्रो विल्सन्स यांची भूमिका

(३) आफ्रिका खंडातील निर्वसाहतीकरण

(अ) बांडुंग परिषद (ब) आफ्रिकी ऐक्य

(क) निर्वसाहतीकरण प्रक्रिया

-------------------

## प्रकरण : १० शीतयुदध

**प्रश्न १ (अ) दिलेल्या पर्यायपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा.**

(१) सीएटो संघटनेचे मुख्यालय --------- येथे होते.

(अ) थायलंड (ब) फिलिपाईन्स

(क) पाकिस्तान (ड) ग्रेट ब्रिटन

(२) स्वयंस्फुर्त सहकार्य हे --------- चे पायाभूत तत्त्व आहे.

(अ) राष्ट्रवाद (ब) राष्ट्रकुल

(क) राष्ट्रप्रेम (ड) राष्ट्रविघातक

(३) शीतयुदधाला पोलादी पडदा ही संज्ञा ----------- यांनी दिली.

(अ) विन्स्टन चर्चिल (ब) वॉटर लिपमन

(क) जोसेफ स्टॅलीन (ड) रिचर्ड निक्सन

(४) बर्लिन भिंत -------- ने उभी केली.

(अ) जर्मनी (ब) फ्रान्स

(क) रशिया (ड) अमेरिका

**(ब) पुढील प्रत्येक संचामधील 'ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

**(१)**

| | **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|---|
| I. | सीएटो | - आग्नेय आशियातील साम्यवादी प्रसार रोखणे |
| II. | अन्झुस | - चीनपासून संरक्षण मिळावे |
| III. | वॉर्सा करार | - रशियाच्या धोरणाला विरोध |
| IV. | सार्क | - दक्षिण आशियाई राष्ट्रांचे प्रश्न सोडविणे |

(२) अलिप्ततावाद संदर्भात भरलेल्या परिषदा

| | **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|---|
| I. | १९६१ | - बेलग्रेड |
| II. | १९७३ | - अल्जिअर्स |
| III. | १९८६ | - नवी दिल्ली |
| IV. | १९८६ | - हरारे |

**प्रश्न २ (अ) ऐतिहासिक ठिकाण / व्यक्ती / घटना संबंधी नावे लिहा.**

(१) ३० जून १९७७ रोजी या संघटनेचे औपचारिकरित्या विसर्जन झाले.

(२) कॉमनवेल्थ गेम्सची संकल्पना मांडलेली व्यक्ती –

(३) दुसऱ्या महायुदधानंतर भांडवलशाही राष्ट्रे व कम्युनिष्ट राष्ट्रे यांच्यातील सत्तेसाठी जो संघर्ष झाला त्याला देण्यात आलेले नाव

(४) सोव्हिएत रशियाचे विघटन यांच्या काळात झाले.-

**(ब) दिलेल्या कारणांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) अन्झुस करारात ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि युनायटेड स्टेट ऑफ अमेरिका वगळता कोणत्याही राष्ट्राला प्रवेश दिला नाही.

कारण –

(अ) त्यांना ग्रेट ब्रिटन आणि फ्रान्सचे महत्त्व वाढू द्यायचे नव्हते.

(ब) हा लष्करी करार होता.

(क) हा गुप्त करार होता.

(ड) हा फक्त मित्रदेशातील करार होता.

(२) मॉस्को ऑलम्पिक क्रीडा स्पर्धेवर अमेरिकेने बहिष्कार टाकला. कारण –

(अ) रशियाचा साम्यवाद अमान्य होता.

(ब) रशियाची वर्णद्वेषी वृत्ती होती.


(क) जगातील सर्व राष्ट्रांनी ऑलम्पिक क्रीडा स्पर्धेवर बहिष्कारटाकला होता.

(ड) रशियाने कारमाल यांच्या नेतृत्वाखाली साम्यवादी सरकार स्थापन केले होते.


प्रश्न ३अ पुढील नकाशाचे निरीक्षण करून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.( या पाठात नकाशा नसल्यामुळे प्रश्न विचारले जाणार नाहीत)

**(ब) दिलेली संकल्पना चित्रे पूर्ण करा.**


(१)




(२)




(३) अलिप्ततावादाच्या परिषदांची माहिती लिहा.



**प्रश्न ४  (अ) टीपा लिहा.**

(१)  शीतयुदध

(२)  अलिप्ततावाद

(३)  सार्क संघटना

(४)  वॉर्सा करार

(५)  नाटो करार

**(ब) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) सेंटो करार विसर्जित करण्यात आला.

(२) सार्क परिषदेला कांही प्रमाणात यश मिळाले.

(३) दुसऱ्या महायुदधानंतर शीतयुदध सुरु झाले.

(४) भारताने राष्ट्रकुलमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला.

**प्रश्न ५ : तुमचे मत नोंदवा.**

(१)  अमेरिका आणि रशिया यांच्यात शीतयुदध सुरु झाले.

(२)  भारताने वसाहतवाद विरोधात नेहमीच भूमिका मांडली.

(३)  सार्क परिषदेला मिळालेल्या यशाची माहिती लिहा.

(४)  अलिप्ततावाद मधील भारताची भूमिका स्पष्ट करा.

**प्रश्न ६ : सविस्तर उत्तरे लिहा.**

(१)  शीतयुदधाचे स्वरूप स्पष्ट करा.

(२)  शीतयुदधात समाविष्ट घटकांची माहिती लिहा.

(३)  शीतयुदधाचे परिणाम स्पष्ट करा.

(४)  सार्क समोरील आव्हानांची माहिती लिहा.

(५)  अलिप्ततावादाचे स्वरूप स्पष्ट करा.

(६)  राष्ट्रकुल स्पर्धेतील भारताचा सहभाग स्पष्ट करा.

**प्रश्न ७ : खालील प्रश्नांची दिलेल्या मुदद्यांच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा.**

(१)  शीतयुदधाची माहिती लिहा.

(अ)शीतयुदधाची पार्श्वभूमी    (ब) शीतयुदधाची वाटचाल (क) शीतयुदधाचे परिणाम

(२)  शीतयुदधाची माहिती लिहा.

(अ) बर्लिन भिंत    (ब) रशियाचे विघटन    (क) शीतयुदधाचे परिणाम

(३)  राष्ट्रकुल संघटना

(अ) स्वरूप    (ब) सचिवालय    (क) भारताची भूमिका

(४)  सार्क परिषद

(अ) परिषदेची ध्येये (ब) सार्क समोरील आव्हाने (क) सार्कचे यश

(५)  शीतयुदधकाळातील करार

(अ) नाटो करार    (ब) सीएटो करार    (क) वॉर्सा करार

# प्रकरण : ११ बदलता भारत – भाग ०१

**प्रश्न १ (अ) दिलेल्या पर्यांयापैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा.**

(१) प्रधानमंत्री रोजगार योजना ------- या मंत्रालयाने सुरु केली.

(अ) वाणिज्य व उदधोग (ब) संरक्षण

(क) वित्त (ड) गृह

(२) जिनिव्हा परिषदेत जो करार झाला तो ---------- करार म्हणून ओळखला जातो.

(अ) सीएटो (ब) नाटो

(क) गॅट (ड) सार्क

(३) अणुस्फोट चाचणी झालेले पोखरण ----------- राज्यात आहे.

(अ) महाराष्ट्र (ब) राज्यस्थान

(क) गुजरात (ड) हरियाना

(४) जगात सर्व प्रथम ----------- या देशात माहितीचा कायदा लागू झाला.

(अ) स्वीडन (ब) फ्रान्स

(क) इंग्लंड (ड) भारत

(५) स्वामी विवेकानंद यांचा जन्मदिन --------- म्हणून साजरा केला जातो.

(अ) राष्ट्रीय शिक्षण दिन (ब) राष्ट्रीय युवक दिन

(क) राष्ट्रीय एकात्मक्ता (ड) राष्ट्रीय विज्ञान दिन

(६) भारताने सर्व प्रथम व्यापारी तत्त्वावर -------- देशाचा उपग्रह अवकाशात सोडला.

(अ) अमेरिका (ब) इटली

(क) जर्मनी (ड) फ्रान्स

**(ब) पुढीलपैकी प्रत्येक संचामधील 'ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

**(१)**

| | **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|---|
| I. | ऑर्थर डंकेल | - WHO चे महासंचालक |
| II. | अण्णा हजारे | - कौशल्य विकासाचा कायदा |
| III. | भावना कांत | - महिला लढाऊ वैमानिक |
| IV. | पी.व्ही.नरसिंहराव | - भारताचे माजी पंतप्रधान |

**(२)**

| | **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|---|
| I. | ए.के.कुलावाल | - जयपूर शहरातील अस्वच्छता |
| II. | श्रीमती अरुणा रॉय | - राज्यस्थान मजदूर किसान शक्ती |
| III. | हर्ष मंडर | - बिलासपुर अन्नधान्य वितरण |
| IV. | अण्णा हजारे | - गुजरात भ्रष्टाचार आंदोलन |

**(३)** **'अ' गट** **'ब' गट**

| | | |
|---|---|---|
| I. | बकलोह | - भारत ओमान लष्करी सराव |
| II. | अमेरिका | - भारत अमेरिका सैनिकांचा सराव |
| III. | पुणे | - भारत इंग्लंड सैनिकांचा सराव |
| IV. | रशिया | - भारत रशिया सैनिकांचा सराव |

**प्रश्न २ (अ) ऐतिहासिक ठिकाण / व्यक्ती / घटना संबंधी नावे लिहा.**

(१) जगातील पहिला बहुउददेशीय व्यापार करार

(२) सॉफ्टवेअर सेवा पुरविणारी आशियातील सर्वात मोठी कंपनी –

(३) भारतात पहिली मेट्रो सेवा सुरु झालेले शहर –

(४) मृदा स्वास्थ कार्ड योजना कोणत्या क्षेत्राशी निगडीत आहे.

(५) दिल्ली, मुंबई, चेन्नई, कोलकत्ता, दिल्ली शहरांना जोडणारा महामार्ग

(६) भारताच्या अण्वस्त्रवाहू पहिल्या पाणबुडीचे नांव

(७) राष्ट्रीय युवक दिन कोणाच्या जन्म दिनी साजरा केला जातो.

**(ब) दिलेल्या कारणांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) भारताने जागतिक व्यापार संघटनेचे सभासदत्व स्वीकारले. कारण –

(अ) भारताला इतर देशांशी व्यापारी स्पर्धा करायची होती.

(ब) भारत जागतिक अर्थव्यवस्थेपासून दूर राहू शकत नव्हता.

(क) भारताला मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारायची होती.

(ड) भारताला जागतिक पातळीवर नेतृत्व करायचे होते.

(२) भारताने राज्यस्थानातील पोखरण येथे अणुस्फोट चाचणी केली. कारण –

(अ) विज्ञानाच्या क्षेत्रात आपली अण्वस्त्र सज्जता सिदध करायची होती

(ब) भारताला जगावर वर्चस्व दाखवायचे होते.


(क) राज्यस्थानमध्ये प्रगती साधायची होती.

(ड) भारताला अतिरिक्त पैसा खर्च करायचा होता.


प्रश्न ३अ पुढील नकाशाचे निरीक्षण करून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.( या पाठात नकाशा नसल्यामुळे प्रश्न विचारले जाणार नाहीत)

**(ब) दिलेली संकल्पना चित्रे पूर्ण करा.**


(१)




(२)राज्यांची पुनर्रचना





(३)




(४)




(५)



**प्रश्न ४ (अ) टीपा लिहा.**

(१) डंकेल प्रस्ताव
(२) प्रधानमंत्री ग्राम सडक योजना
(३) स्पीड पोष्ट
(४) टपाल खाते
(५) गॅटकरार
(६) भारताचे युवक धोरण
(७) भारत संचार निगम लिमिटेड

**(ब) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) भारतात माहितीचा अधिकार लागू करण्यात आला.
(२) मेट्रो रेल्वे सुरु करण्यात आली.
(३) भारताने उदारीकरणाचा स्वीकार केला.
(४) भारतात कृषी पर्यटने भरविण्यात येतात.

**प्रश्न ५ : तुमचे मत नोंदवा.**

(१) भारत अवकाश संशोधन क्षेत्रात अग्रणी देश आहे.
(२) भारतात कृषी क्षेत्रासाठी विविध योजना राबविण्यात आल्या.
(३) भारत सरकारने जम्मू काश्मीरमधील ३७० कलम रदद केले.
(४) जवाहर नेहरू नागरी पुनरुत्थान मिशन
(५) टपाल तिकिटांची वाटचाल.
(६) भारताची संरक्षण क्षेत्रातील प्रगती कशी आहे.

**प्रश्न ६ : सविस्तर उत्तरे लिहा.**

(१) सुवर्णजयंती ग्रामीण स्वयंरोजगार योजना
(२) ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उददेशाने कोण कोणत्या योजना राबविल्या आहेत.
(३) विज्ञान युगाप्रमाणे पोस्ट खाते बदलत आहे.
(४) जागतिक व्यापार संघटनेचे स्वरूप स्पष्ट करा.
(५) जागतिक व्यापार संघटनेमुळे भारतावर झालेले परिणाम लिहा.
(६) पिक विमा योजनेचे स्वरूप लिहा.

**प्रश्न ७ : खालील प्रश्नांची दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा.**

(१) संपर्क साधनांची माहिती लिहा.

(अ)टपाल सेवा (ब) स्पीड पोस्ट (क)टपाल तिकीट

(२) माहितीचा अधिकार अधिनियमाची माहिती लिहा.

(अ) भारतात ही चळवळ कशी सुरु झाली.(ब) माहितीची व्याख्या (क) नागरिकांचे हक्क

(३) ग्रामीण भागातील विकासाच्या योजनांची माहिती लिहा.

(अ) प्रधानमंत्री रोजगार योजना (ब) जवाहर ग्राम समृदधी योजना (क) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना

(४) नवीन निर्मिती झालेल्या राज्यांची माहिती लिहा.

(अ) छत्तीसगढ (ब) झारखंड (क) तेलंगण (ड) जम्मू काश्मीर

---

## प्रकरण : १२ - बदलता भारत : भाग ०२

प्रश्न १ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा.

(१) १९९५ पासून भारत सरकारच्या आरोग्य विभागाच्या वतीने --------- लसीकरण मोहीम सुरु केली.

(अ) गोवर (ब) पल्स पोलिओ

(क) बीसीजी (ड) त्रिगुणी

(२) एर्नाकुलम हा १०० टक्के साक्षर झालेला जिल्हा ---------- राज्यात आहे.

(अ) केरळ (ब) गुजरात

(क) कर्नाटक (ड) तामिळनाडू

(३) चिपको आंदोलन ---------- यांनी सुरु केले.

(अ) भाऊ काटदरे (ब) डॉ. राजेंद्रसिंह

(क) मेधा पाटकर (ड) सुंदरलाल बहुगुणा

(४) नर्मदा बचाव आंदोलन ---------------- यांनी केले.

(अ)भाऊ काटदरे (ब) डॉ. राजेंद्रसिंह

(क)मेधा पाटकर (ड) सुंदरलाल बहुगुणा

(५) पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी ---------- ही मोहीम राबविली आहे.

(अ) अतुल्य भारत (ब) ऑलम्पियाड

(क) सर्व शिक्षा (ड) पारंपारिकता

**(ब) पुढील प्रत्येक संचामधील ‘ब’ गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

**(१)**

| | **‘अ’ गट** | **‘ब’ गट** |
|---|---|---|
| I. | मानवाधिकार आयोग | – मानवी हक्काचे संरक्षण |
| II. | सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंट | - दिल्लीतील प्रदुषणाचा अभ्यास |
| III. | सी-केप | - कासवांचे जतन करणारी संस्था |
| IV | इंटक | - वारशाविषयी जतन व जागृती करणारी संस्था |

**(२)**

| | **‘अ’ गट** | | **‘ब’ गट** |
|---|---|---|---|
| I. | खाशाबा जाधव | - | कब्बडी |
| II. | सचीन तेंडूलकर | - | क्रीकेट |
| III. | प्रेमसागर मिस्त्री | - | गिधाडांचा अभ्यास |
| IV. | भाऊ काटदरे | - | कासव महोत्सव |

**प्रश्न २ (अ) ऐतिहासिक ठिकाण / व्यक्ती / घटना संबंधी नावे लिहा.**

(१) नारी शक्ती पुरस्कार मिळालेली स्त्री –

(२) भारतरत्न हा सर्वोच्च सन्मान मिळविणारा खेळाडू –

(३) ‘सह्याद्री निसर्ग मित्र’ संस्थेच्या माध्यमातून काम करणाऱ्या व्यक्तीचे नांव -

(४) ‘सारे शिकूया पुढे जाऊया’ या ध्येयवाक्याने काम करणारी योजना –

(५) पर्यटन मंत्रालयाचा वतीने माहिती देणारा टोल फ्री नंबर –

**(ब) दिलेल्या कारणांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) सर्वोच्च न्यायालयाने दिल्लीतील सार्वजनिक वाहनांना सीएनजी वापरणे बंधन कारक केले. कारण –

(अ) सीएनजी शिवाय पर्याय नव्हता.

(ब) सीएनजीचा वापर सुलभ असतो.

(क) प्रदूषणावर उपाय म्हणून शिफारस केली आहे.

(ड) पेट्रोल डीजेलची उपलब्धता होत नाही.

(२)भारत सरकारने क्रीडा धोरणाची घोषणा केली. कारण –

(अ) परदेशी खेळाडूंना आकर्षित करण्यासाठी.

(ब) खेळाच्या प्रसार आणि लोक सहभागातून जागृती करणेसाठी.

(क) शासकीय निधी खर्च करण्यासाठी.

(ड) दुष्काळी भागांना मदत करण्यासाठी.

(३) महाराष्ट्र शासनाने लेक लाडकी हे अभियान राबविले. कारण –

(अ) मुलींना शिष्यवृत्ती द्यायची होती.

(ब) दर हजारी मुलांमागे मुलींचे प्रमाण कमी झाले होते.


(क) मुली विविध क्षेत्रात प्रगती साधण्यास प्रयत्नशील असतात.

(ड) मुलींच्या शारीरिक तक्रारी कमी करण्यासाठी.


प्रश्न ३अ पुढील नकाशाचे निरीक्षण करून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.( या पाठात नकाशा नसल्यामुळे प्रश्न विचारले जाणार नाहीत)

**(ब) दिलेली संकल्पना चित्रे पूर्ण करा.**


(१)




(२)



(३)




**प्रश्न ४ (अ) टीपा लिहा.**

(१) आयुष

(२) पोलिओ निर्मूलन

(३) वायू प्रदूषण

(४) सांस्कृतिक वारसा स्थळे

**(ब) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) दिल्लीमध्ये सीएनजी अनिवार्य केला.

(२) १९९० हे वर्ष आंतरराष्ट्रीय साक्षरता वर्ष म्हणून जाहीर करण्यात आले.

(३) खेळांच्या प्रसारणासाठी विविध वाहिन्या काम करतात.

(४) पर्यटकांची संख्या वाढविण्यासाठी विविध योजना सुरु केल्या आहेत.

**प्रश्न ५ : तुमचे मत नोंदवा.**

(१) पर्यटनस्थळाची प्रत्येक व्यक्तीने काळजी घेणे आवश्यक आहे.

(२) भारताच्या क्रीडा धोरणाविषयी तुमचे मत लिहा.

(३) खेळाडूंना विविध पुरस्कार देण्यात येतात.

**प्रश्न ६ : सविस्तर उत्तरे लिहा.**

(१) पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी भारताचे धोरण स्पष्ट करा.

(२) भारत सरकारचे क्रीडा धोरण स्पष्ट करा.

(३) भारताच्या खेलो इंडिया योजनेची माहिती लिहा.

(४) २०१८ साली टुरिझम मार्ट का सुरु करण्यात आले.

**प्रश्न ७ : खालील प्रश्नांची दिलेल्या मुदद्यांच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा.**

(१) प्राथमिक शिक्षणाची माहिती लिहा.

(अ) DPEP कार्यक्रम (ब) शालेय पोषण आहार (क) सर्व शिक्षा अभियान

(२) भारतातील प्रदूषण समस्या लिहा.

(अ) वायू प्रदूषण (ब) पीयूसी (क) पर्यावरण रक्षणाचे कार्य

(३) राहीबाई पोपेरे यांचे कार्य सांगा

(अ) बीजमाता (ब) पुरस्कार (क) बियाणे साठविण्याची पदधती

(४) खालील व्यक्तींचे कार्य स्पष्ट करा.

(अ) भाऊ काटदरे (ब) प्रेमसागर मिस्त्री (क) राहीबाई पोपेरे

**विद्यार्थ्यांसाठी सूचना -**

- इतिहास विषयाचा संकेतांक (३८) आहे.
- इतिहासाची कृतीपत्रिका ८० गुणांची असून तुम्हाला त्यासाठी ३ तासांचा अवधी असेल.
- या शैक्षणिक वर्षातील गाळलेला अभ्यासक्रम समाविष्ट नाहीत.
- ही प्रश्नपेढी सरावासाठी व प्रश्नांचे स्वरूप समजण्यासाठी नमुन्यादाखल विकसित केली आहे. याबरोबरच पाठ्यपुस्तकाचे सखोल वाचन करून इतर प्रश्नांचीही तयारी करावी.
- प्रश्नपेढी वहीत सोडवण्याचा सराव करा. विशेषत: संकल्पनाचित्रे वहीत काढण्याचा सराव करा.
- प्रत्येक प्रश्नाचे अपेक्षित उत्तर याविषयी आपले शिक्षक, सहाध्यायी यांच्याशी चर्चा करा.
- येणाऱ्या परीक्षेचा कोणताही ताण न  घेता सातत्याने आपला अभ्यास व सराव चालू ठेवा.
- परीक्षेसाठी तुम्हाला मन:पूर्वक शुभेच्छा!

---